अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## गौडगाव येथे निवृत्त शिक्षकाचे घर फोडले

सोलापूर : निवृत्त शिक्षकाच्या बंद घराच्या पाठीमागील दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील २ लाख रुपये रोख आणि १३५ ग्रॅम सोन्याचे दागिने असा ऐवज पळविला. ही चोरी गौडगाव (ता.बार्शी) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. दिवसा हा प्रकार घडल्यामुळे गौडगाव परिसरातील नागरिकात भीतीचे वातावरण पसरले आहे.

गौडगाव (ता.बार्शी) येथे गुलाब भीमराव रोहिले हे निवृत्त शिक्षक राहण्यास आहेत.ते घराला कुलूप लावून आपल्या कुटूंबियासोबत रविवारी सकाळी उंडेगाव (ता.बार्शी) येथे राहणाऱ्या मुलीकडे गेले होते.तेथून सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास घरी परतले आणि मुख्य गेटचे कुलूप उघडून आत प्रवेश केला. त्यावेळी त्यांना घराच्या मेन दरवाजाचा कोयंडा तुटलेला तसेच आतून दरवाजा बंद असल्याचे दिसून आले.त्यानंतर त्यांनी पाठीमागे जाऊन किचनचा दरवाजा पाहिला असता तो दरवाजा उघडा आणि घरात चोरी झाल्याचे आढळले. चोरट्याने घरामागच्या किचनचा दरवाजा उचकटून आत प्रवेश केला आणि लोखंडी कपाटातील रोख २ लाख रुपये

**रोख रकमेसह १३५ ग्रॅम सोने पळवले**

आणि राणीहार, गंठण, लॉकेट, चैन आदी एकूण १३३ ग्रॅम सोन्याचे दागिने पळवले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर रोहिले यांनी वैराग पोलिसात फिर्याद दाखल केली. एकूण ४ लाख ६६ हजाराचा ऐवज चोरीस गेल्याचे नोंद वैराग पोलिसात झाली. पुढील सभास फौजदार जाधव करीत आहेत.

www.surajyadigital.com । बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६ । वर्ष : २४ वे अंक : १४८ वा किंमत : ५ रुपये पाने १२

# सासरा सिकंदर Murder by जावई दफेदार

## पोलीस पत्नीवर संशय, घटस्फोटाच्या मागणीचा मनात राग

## जावयाकडून सासऱ्याची निर्घृण हत्या, स्वत:वरदेखील वार



मृत : सिकंदर शेख



- सिकंदरांना वाचवायला गेलेला पुतण्या वाचला
- शेतात वाहिला रक्ताचा पाट
- मृत सिकंदरांची मुलगी अन् मुलगा पोलीस सेवेत
- मर्डरच्या घटनेनं दक्षिण' तालुक्यात खळबळ

सोलापूर/प्रतिनिधी

इंगळगी (ता.दक्षिण सोलापूर) येथे मंगळवार (ता.२४) सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास सिकंदर मुलका शेख (वय ५५) यांच्यावर धारधार चाकुने 'घिपी घिपी'वार करण्यात आले. त्यात ते जागीच गतप्राण झाले. तीन नंबरचा जावई सादिक दफेदार (वय ३५, रा. पानमंगरूळ, ता. दक्षिण सोलापूर) याने हा मर्डर केल्याची माहिती पुढे आली आहे. पोलीस पत्नीवर संशय आणि घटस्फोट मागणीचा राग यातून त्यानं हे राक्षसी कृत्य करतानाच, स्वत:वरदेखील वार करुन आत्महत्येचा प्रयत्न केला. यादरम्यान सिकंदरांना खुनातून वाचवायला गेलेला पुतण्या यांच्यावरदेखील संशयित आरोपी सादिक (जावई) याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो पळून गेल्यानं वाचला. पोलीस सुत्रांकडून ही प्राथमिक माहिती मिळाली असून घटनेच्या अनुषंगाने, वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया मंगळवारी रात्री उशीरापर्यंत सुरु होती.

मिळालेल्या माहितीनुसार, डोक्यात सणक आणि अंगात शिरलेले सैतानाचे भूत यामधून सादिक (जावई) याने सासरा सिकंदर यांच्यावर चाकूने तीक्ष्ण वार करुन त्यांना यमसदनी पाठवले. चाकूने सपासप वार झाल्यानं मृत सिंकदर हे रक्ताच्या थारोळ्यात पडले. त्यातून शेतात रक्ताचा पाट वाहिला. मर्डरच्या घटनेत वयोवृद्ध सिकंदरांचा मृत्यू झाल्याची माहिती उपस्थितांनी दिली.

दरम्यान मृत सिकंदर शेख यांची मुलगी आणि मुलगा हे दोघेही मुंबई पोलीस सेवेत असल्याचीदेखील माहिती पुढे आली. आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या सादिक याच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. मंगळवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास सिकंदर शेख हे शेतात होते, त्यावेळी शेतात कोणी नसल्याचा फायदा उठवत जावई सादिक याने त्यांच्यावर हल्ला चढवला. मृत सिकंदर यांनी मुंबई पोलीस सेवेत असलेल्या मुलीला जावाई सादिक याच्यापासून वेगळे केले होते. त्याशिवाय त्याच्याकडून घटस्फोट मिळावा यासाठी खटला सुरु होता. याचा प्रचंड राग सादिक याच्या मनात होता. तो मृत सिकंदर यांच्यावर अनेक महिन्यांपासून चिडून होता. पाळत ठेवून होता. सिकंदर यांना शेतात गाठले आणि त्यांची निघृण हत्या केली. सासऱ्याचा गळा चिरून तो घरी निघाला होता, मात्र ग्रामस्थांना माहिती होताच, भेदरलेल्या जावयाने चाकूने स्वत:च्या छातीत वार करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

### पोलीस पत्नीवर संशय, सादिककडून मारहाण

सिकंदर शेख यांना चार मुली आणि दोन मुले आहेत. यामधील तिसऱ्या क्रमांकाची मुलगी पानमंगरूळ (दक्षिण सोलापूर) गावात दफेदार परिवारात दिली आहे. संशयित आरोपी सादिक दफेदार हा तिसऱ्या क्रमांकचा जावई आहे. सादिकची पत्नी मुंबई पोलीस दलात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत आहे. लग्नानंतर सादिक हा पोलीस पत्नीवर संशय घेत होता. काही महिने सादिक दफेदार हा पत्नीसोबत मुंबईत राहत होता. मुंबईत देखील सादिक हा पोलीस पत्नीवर संशय घेऊन मारहाण करत असे, अशीदेखील माहिती मिळाली.

### बायकोला नोकरी, आपण मात्र सुशिक्षीत बेकार असल्याचं सादिकला शल्य

साधारण सहा वर्षांपूर्वी सिकंदर यांच्या मुलीसोबत सादिक याचा विवाह झाला होता. तो पदवीधर होता. विवाहानंतर दोघेही मुंबईला गेले होते. दोघेही पोलीस भरतीसाठी प्रयत्न करत होते. या टप्प्यावर पत्नी पोलीस दलात भरती झाली. मात्र सादिक भरती होऊ शकला नव्हता. त्याचं शल्य त्याच्या मनात सतत बोचत होते. पत्नीला आपणच पोलीस भरती केलो, सगळा खर्च केला आणि प्रयत्न करुनदेखील आपण स्वत: भरती झालो नाही यावरुनदेखील संशयित आरोपी सादिक वैफल्यग्रस्त झाला होता, याच अवस्थेत तो शेती करत होता, असेही सांगण्यात आले.

### काही ठळक नोंदी

| | |
|---|---|
| मृत सिकंदरांचा पोलीस सेवेतील मुलगा अद्याप अविवाहित | भाऊ, दोघांच्या बायका सख्या बहिणी, जावा-जावा |
| मंगळवारी रात्री सासरे सिकंदर यांच्यावर झाले अंत्यसंस्कार | सादिक आणि बंदेनवाज या दोघांच्या बायका जवळच्या नात्यामधील |
| संशयित सादिक आणि पानमंगरुळचे कोतवाल बंदेनवाज हे दोघे सख्खे | सिव्हील हॉस्पिटलमध्ये नातेवाईकांची मोठी गर्दी |

**शेजाऱ्याच्या शेतकऱ्यांना संशय; रक्ताच्या थारोळ्यात तडफडणारे दिसले सिकंदर**

इंगळगी गावातील शेतातच जावई सादिक याने सासरे सिकंदर शेख यांची गळा चिरून हत्या केली. आजूबाजूच्या शेतातील शेतकऱ्यांना संशय आला आणि त्यांनी तडफडत असलेल्या सिकंदर यांच्याकडे धाव घेतली. त्यावेळी सादिक दफेदार याने स्वत:वर चाकूने वार करत आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. इंगळगी गावातील ग्रामस्थांनी ताबडतोब वळसंग पोलीस स्टेशनला कळविले. तद्नंतर तातडीनं पोलीस निरीक्षक डोंगरेंसह पथक घटनास्थळी दाखल झालं. मृत सासरे सिकंदर आणि जखमी सादिक या दोघानांही सिव्हील हॉस्पीटलमध्ये रवाना करण्यात आले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला.

### पत्नीला खल्लास करण्याची भाषा

**समजुतीचे प्रयत्न अन् घटस्फोटाचा खटला**

सादिकचे सासरे सिकंदर शेख यांनी अनेकदा बैठका घेऊन जावई सादिक दफेदारची समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता. मागील वर्ष-दीड वर्षांपासून संशयित आरोपी जावई सादिक दफेदार याने राग धरला होता. पोलीस पत्नीलाच खलास करतो, अशी अनेकदा त्याने धमकीही दिली होती. सिकंदर शेख यांनी जावयाला मुलीपासून लांब केले होते आणि घटस्फोटासाठी मुलीमार्फत खटला दाखल केला होता.

## अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर 'डीजीसीए'कडून पहिली मोठी कारवाई

मुंबई/प्रतिनिधी

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर डीजीसीएने पहिली मोठी कारवाई केली आहे. अजित पवार हे व्हीएसआर कंपनीच्या विमानातून प्रवास करत असताना विमानाचा अपघात झाला. या घटनेनंतर आमदार रोहित पवार यांनी कंपनीच्या विमानात तांत्रिक बिघाड असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी प्रचंड वातावरण तापलेलं असताना डीजीसीएकडूनही तपास केला जात होता. विविध संस्थांकडून या प्रकरणी तपास केला जात आहे. या दरम्यान, डीजीसीएने व्हीएसआरच्या ४ विमानांच्या उड्डाणावर बंदी घातल्याची माहिती आहे. लेअरजेट ४०/४५ मॉडेलच्या चार विम ानांच्या उड्डाणावर बंदी घालण्यात आली आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर कंपनीवर गंभीर आरोप केले जात होते. तपास यंत्रणांनी अपघातग्रस्त विमानाची तपासणी केली तसेच विमानाचा डेटा गोळा करण्याचे काम देखील युद्ध पातळीवर सुरु करण्यात आले होते. याबाबतचे वेगवेगळे दावे, आरोप केले जात होते. ही कारवाई कंपनीसाठी मोठा धक्का आहे.

### व्हिएसआरच्या चार विमानांच्या उड्डाणावर बंदी



**कारणे दाखवा नोटीस**

डीजीसीएकडून कंपनीच्या विमानांचे ऑडिट केले. या ऑडिटमध्ये वीएसआर कंपनीच्या चार विमानांमध्ये देखभालीत चुका आणि कमतरता असल्याचे डीजीसीएकडून स्पष्ट करण्यात आले आहे. कंपनीकडून हवाई सुरक्षा नियमांचे पालन होत नाही म्हणून या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती आहे.

ICC MEN'S T20 WORLD CUP

**आजचा सामना**

श्रीलंका v/s न्यूझीलंड

स्थळ : कोलंबो, श्रीलंका
वेळ : सायंकाळी ७ वाजता

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे




आपल्या आवाक्या बाहेर !

| कल्याण |
|---|
| 699-49-469 |

| मुंबई |
|---|
| 990-82-246 |

7 9 6

## सातपुतेंना फडणवीसांनी दिली नवी ताकद




### भाजपच्या राज्य चिटणीसपदी नियुक्ती

सोलापूर/प्रतिनिधी

आठ महिन्यांपासून प्रतीक्षेत असलेली भारतीय जनता पक्षाची बहुचर्चित राज्य कार्यकारिणी अखेर मंगळवारी जाहीर झाली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नव्या-जुन्यांचा मेळ घालत ४३ जणांची जम्बो कार्यकारिणी जाहीर केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहिते पाटलांना टक्कर देणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक माजी आमदार राम सातपुते यांच्यावर नवी जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांची पक्षाने राज्य चिटणीसपदी नियुक्ती केली आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी १२ उपाध्यक्ष, ०६ सरचिटणीस, १२ चिटणीस, कोषाध्यक्ष, मुख्य प्रवक्ता, मुख्यालय प्रभारी आणि विविध मोर्चांच्या अध्यक्षांचा समावेश असलेली राज्य कार्यकारिणी जाहीर केली आहे. त्यात पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातून माजी आमदार राम सातपुते यांना एकमेव संधी मिळाली आहे. सातपुते यांच्याकडे राज्य चिटणीस पदाची जबाबदारी



देण्यात आली आहे. नव्या जबाबदारीमुळे भाजप संघटनेत सातपुते यांचे राजकीय वजन वाढल्याचे मानले जात आहे. राम सातपुते यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून आपल्या राजकीय कारकिर्दीस सुरुवात केली.

२०१९ मध्ये माळशिरसमधून उमेदवारी मिळाल्यामुळे राम सातपुते हे पहिल्याच निवडणुकीत आमदार झाले. पक्षाच्या आदेशानुसार सातपुते यांनी सोलापुरातून लोकसभेची निवडणूक लढवली. मात्र, त्या निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. त्या लोकसभा निवडणुकीपासून मोहिते पाटील आणि माजी आमदार राम सातपुते यांच्यात उभा राजकीय संघर्ष सुरू झाला. तो आजपर्यंत कायम आहे. लोकसभेतील पराभावानंतर सातपुते यांनी माळशिरसमध्येच राहण्याचा निर्णय घेतला. अकलूज नगरपालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत सातपुते यांच्या नेतृत्वाखाली भाजप उमदेवारांनी चांगली मते घेतली, तर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते ह्या दहिगाव गटातून जिल्हा परिषदेवर निवडून आल्या आहेत. त्यामुळे मोहिते पाटलांना निकराने टक्कर देणाऱ्या सातपुते यांना राज्य कार्यकारिणीवर स्थान देत पक्षाने त्यांच्या पाठीशी ताकद उभी केल्याचे मानले जात आहे.